3.3.15

**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक** :एफएफएस-२००४/४१९/प्र.क्र.१२१/नवि-६
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
**दिनांक**:५ ऑगस्ट, २००४.

**प्रति,**

सर्व महापालिका आयुक्त,
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई,
सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
आयुक्त तथा संचालक , नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक, उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई
संचालक, व्यावसायिक प्रशिक्षण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगरपरिषद मुख्याधिकारी,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय,
नगर विकास विभागातील सर्व अधिकारी.
अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय : अग्निसुरक्षेसंबंधी करावयाची उपाययोजना.....**

आग लागण्याची दुर्देवी घटना लक्षात घेता सुरक्षिततेचे उपाय / प्रतिबंधकात्मक खबरदारी घेण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने शासन परिपत्रक शालेय शिक्षण विभाग क्र. शापोआ-२००४/१५५/प्राशि-४, दि. २२.७.२००४ परिपत्रकान्वये उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. (सोबत प्रत जोडली आहे.) या उपाययोजनेप्रमाणेच शाळा व अन्य इमारतीत आगीसारख्या दुर्घटना घडू नयेत म्हणून महानगरपालिका / नगरपालिका यांनी त्यांच्या क्षेत्रातील शाळा / महाविद्यालयाबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करावी:-

१) शाळा/महाविद्यालयास बांधकामाची परवानगी देतांना सदर इमारतीत प्रत्येक मजल्यावर अग्निरोधक यंत्रणा आहे व आग विझविण्यासाठी २४ तास पुरेशा प्रमाणात पाणी साठविण्याची टाकी बांधल्याची खात्री करावी.

रोटा प्रिंट/एच-568(500-8-04)1

२) आग विझविण्यासाठी आपत्कालिन व्यवस्था म्हणून पुरेशा प्रमाणात वाळूचा साठा असल्याची खात्री करावी.

३) शाळा / महाविद्यालयात ज्वलनशील पदार्थ असू नयेत. मात्र प्रयोगशाळेत असा वापर करणे अनिवार्य असल्याने तेथे अग्निशामक उपकरणे (फायर एक्स्टिंगविशर) असल्याची खात्री करावी.

४) शाळा / महाविद्यालयातील जिन्यात अथवा छन्न भागात (कॉरिडॉर) बेंच, खुर्च्या अथवा कोणतीही अडगळ न ठेवता तो मार्ग नेहमी मोकळा ठेवावा.

५) आपत्कालिन प्रसंगासाठी वापरावयाच्या मार्गाची सर्व विद्यार्थ्यांना माहिती असावी व याबाबत साईन बोर्ड्स चा वापर करावा.

६) शाळा / महाविद्यालयाचे छत टिकावू (आरसीसी) नसल्यास अग्रक्रमाने असे छत बांधण्याच्या कामास प्राधान्य द्यावे.

७) आपत्काळात अग्निशमन वाहने येऊ शकतील इतक्या रुंदीचे रस्ते (ॲक्सेस ॲण्ड ॲप्रोच) असावेत.

८) उपाहारगृह असल्यास ते मुख्य इमारतीपासून दूर असावे व अशा ठिकाणी अग्निरोधक यंत्रणा बसविल्याची स्थानिक अग्निशमन अधिका-यांमार्फत खात्री करावी व त्याचे दरमहा परिक्षण करावे.

९) जिन्यावरुन येतांना भिंत व रेलिंगच्या आधाराने दोन ओळींमध्ये शिस्तीने खाली उतरावे.

१०) मजल्यावरील वर्गांचे दरवाजे व मार्गातील, जिन्याजवळील अग्निरोधक दरवाजे बंद करावेत.

११) धुरातून रांगत मार्गक्रमण करावे. (By crowling).

१२) आगीपासून बचाव करण्याकरीता जमीनीच्या खालच्या बाजूला रहा व ओल्या कपडयाचे आवरण नाकावर ठेवून आगीपासून बचाव करा.

१३) आपल्या कपडयांना आग लागली असेल, तर जमीनीवर पडून लोळा व लोळतांना हाताने चेहरा झाका.

१४) इमारतीच्या सज्जामध्ये किंवा खिडकीत जाऊन मदतीकरिता पुकारा.

१५) उद्वाहनामध्ये अडकले असाल तर उद्वाहनामधील आपत्कालीन घंटी (Emergency Bell) वाजवून अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा.

१६) अग्निशमन कर्मचा-यास त्याच्या कार्यात आवश्यक ते सहकार्य करा.

१७) अग्निशमन विभागाकडून ध्वनीक्षेपण यंत्रणेमार्फत मिळणा-या सूचनांचे पालन करावे.

१८) एकदा सुटका झाल्यावर परत इमारतीत प्रवेश करु नका. सुरक्षित जागेवर, इमारतीच्या पायथ्याशी जमा व्हा.

१९) अग्निशमन केंद्राची गाडी आल्यावर त्यांना सविस्तर माहिती द्या व मार्गदर्शन करा.

विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरण असणे आवश्यक असून असे वातावरण शाळा/ महाविद्यालयात असल्याची खात्री मनपा / नपांनी घेणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व महापालिका आयुक्त, सर्व मुख्याधिकारी, सर्व अग्निशमन अधिकारी यांनी वरील सूचनांची अंमलबजावणी करावी व पत्राची पोच द्यावी. याबाबत अधिक मार्गदर्शन व सल्ल्यासाठी अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचेकडे संपर्क साधावा.

सदर सूचनांची अंमलबजावणी महानगरपालिका व नगरपालिका यांचे कार्यक्षेत्रातील शासकीय तसेच खाजगी महाविद्यालयांना देखील लागू करावी.

**सहपत्र-दोन**

**(म.दि.आडिवरेकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**शाळा व महाविद्यालयात आपत्कालीन प्रसंग निर्माण होऊ नयेत यासाठी ध्यावयाची दक्षताः**

१. इमारतीमध्ये धुम्रपान करु नये.

२. शाळेच्या/महाविद्यालयाच्या नविन इमारतीचे नकाशे मंजूर करतांना बांधकाम नियमावलीतील तरतूदी नुसार इमारतीमध्ये कमीतकमी दोन जिने असणे आवश्यक आहे जेणे करुन आपत्कालीन प्रसंगी कमीतकमी वेळेत सर्व विद्यार्थी सुखरुपपणे सुरक्षित ठिकाणी पोहचू शकतील. मात्र या साठी बांधकामात नियमावलीतील तरतूदी बंधनकारक राहतील.

३. शाळेच्या/महाविद्यालयाच्या आराखडयांमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार करतांना किंवा आंर्तगत रचनांमध्ये बदल करतांना वास्तू शास्त्रज्ञ व स्थानिक मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे कडून सदर फेरफार तपासून मंजुर करुन घ्यावेत.

४. शाळेच्या/महाविद्यालयाच्या जिने व मार्गिका तसेच इमारतीच्या सज्ज्यावर कागदी रद्दी लाकडी सामान, बारदान आदी सामान ठेवून मार्ग अडवून ठेऊ नये ते नेहमी जाण्यायेण्यासाठी मोकळे ठेवावेत.

५. विद्युत उपकरणाचा निष्काळजीपणे वापर करु नये.

६. विजेच्या प्लगवर एकाच विद्युत यंत्राचा वापर करावा. (ओव्हर लोडींग टाळावे).

७. कक्षातील कागदपत्रे, कपाटे, रॅक्स इ. विद्युत स्विच बोर्डाला चिकटून ठेऊ नयेत.

८. कार्यालय सोडतांना विजेचे दिवे, पंखे व वातानुकुलित यंत्रणा बंद करावी.

९. उपाहारगृहातील स्वयंपाक गॅस व प्रयोग शाळेतील गॅस सिलेंडरचा वापर झाल्यानंतर गॅस सिलेंडरचा मेन वाल्व बंद करावा.

१०. शाळेच्या/महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत अथवा कोठारांमध्ये ज्वालाग्राही पदार्थाचा साठा करु नये. प्रयोग शाळेतील अथवा इतर ज्वालाग्रही साधनांपासून लाकूड, रसायने, तेल, तेलकट कपडे दूर ठेवावेत.

११. शाळेच्या/महाविद्यालयाच्या इमारतीच्या आवारात फटाके पेटवू नयेत.

१२. शाळेच्या/महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना लाइटर किंवा आगपेटी मिळाल्यास त्यांनी ती त्वरीत शिक्षकांच्या स्वाधीन करावी.

१३. शाळेच्या/महाविद्यालयाच्या उपाहार गृह व प्रयोग शाळा यामध्ये किमान प्रत्येकी दोन पोर्टेबल अग्निशामके ठेवावीत यात प्रामुख्याने एक ड्राय केमिकल पावडर व सि.ओ.टू. पोर्टेबल अग्निशामक असावे.

१४. शाळेच्या/महाविद्यालयाच्या वार्षिक महोत्सवात किंवा वर्धापन दिना निमित्त आयोजित कार्यक्रम करतांना तसेच इतर कुठल्याही कार्यक्रमांसाठी तात्पुरते शामियांने उभारतांना अग्नि प्रतिबंधात्मक उपायोजनांना जास्त महत्व दयावे. उदा.

अ. शामियांनातील किंवा मंडपातील आत बाहेर जाण्यासाठी उपलब्ध केलेले दरवाजे आकाराने मोठे व संख्येने जास्त ठेवावेत.

ब. सदर शामियांने किंवा मंडप उभारतांना शक्यतोवर लवकर आग न लागणा-या सामानाचा उपयोग करावा.

क. अशा शामियांनात किंवा मंडपात विजेच्या जोडण्या करतांना विशेष काळजी घेऊन कुठेही जिवंत विद्युत तारा उघडया राहणार नाहित याचीदक्षता घ्यावी तसेच विजेच्या सर्किटवर अधिक विद्युत भार घालू नये आणि एका प्लगमध्ये एका विद्युत यंत्राचा वापर करावा.

ड. तात्पुरत्या उभारलेल्या शामियांनात किंवा मंडपात भटारखाना उभारु नये. भटारखाना व शामियांनात/मंडपात सुरक्षित अंतर ठेवावे.

इ. अशा मंडपांजवळ पाण्याची व्यवस्था करावी. अशा मंडपाची तपासणी जवळच्या अग्निशमन विभागामार्फत करुन घ्यावी व दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**<u>शाळा व महाविद्यालयातील आपतकालीन व्यवस्थापन :</u>**

१. शाळेच्या/महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी आपतकालीन प्रसंग समर्थपणे हाताळण्यासाठी स्वतः पुढाकार घेऊन या बाबत आराखडा तयार करुन घ्यावा.

२. सदर आराखडयात शाळेच्या/महाविद्यालयाच्या इमारतीची संपूर्ण माहिती असावी. उदा. शाळेच्या/महाविद्यालयाच्या बांधकामाची सद्य स्थिती, शाळेतील जिने, उपहार गृह, स्वयंपाक घर, कोठार, प्रयोग शाळा इत्यादींचा समावेश करावा तसेच इमारतीतील विद्युत यंत्रणा, अग्निशमनासाठी उपलब्ध केलेली अग्निशमन उपकरणे आपतकालीन प्रसंगी सर्व कर्मचारी व विद्यार्थ्यांना सुचना देण्यासाठी वापरावयाची अग्निसुचक यंत्रणा (भोंगा/सायरन). अग्निशमनासाठी उपलब्ध पाण्याचा साठा, आपत्कालीन प्रसंगी विविध शासकिय व निमशासकिय सेवांची मदत घेण्यासाठी त्यांचे दुरध्वनी कार्यालयात दर्शनी भागी लावून ठेवावेत. उदा.अगिनशमन सेवा, पोलिस, वैद्यकिय सेवा/रुग्णवाहिका, इत्यादी.

३. शाळेच्या/महाविद्यालयाच्या प्रत्येक मजल्यावर एका शिक्षकाची आपत्कालीन अधिक्षक म्हाणून नियुक्ती करावी, जो आपत्कालीन प्रसंगी त्या मजल्याच्या सुरक्षिततेसाठी काम करेल. सदर अधिक्षक मजल्यावरील सर्व वर्गातील मुले

व्यवस्थितरित्या सुरक्षित ठिकाणी पोहचल्याची खात्री करेल. सदर अधिक्षकाने मजल्यावरील सर्व वर्ग, स्वच्छता गृह व इतर ठिकाणी कोणी अडकलेले किंवा राहिलेले नाहीत याची पूर्ण खात्री करावी. तसेच मजल्यावरील सर्व वर्गांचे दरवाजे बंद करत पूर्व नियोजित सुरक्षित स्थळावर पोहचावे. मजल्यावरील मुले सुरक्षित ठिकाणी पोहचल्यावर वर्गाप्रमाणे त्यांची उपस्थिती घेऊन अधिक्षकाने मुख्याध्यापकांना त्याची माहिती दयावी.

४. प्रत्येक वर्गासाठी संबधीत वर्गशिक्षक या कामासाठी नियुक्त करावा. प्रत्येक वर्ग शिक्षकांने आपल्या वर्गातील सर्व विद्यार्थी नजिकच्या व सुरक्षित जिन्यानी पूर्व नियोजीत सुरक्षित स्थळी किंवा शाळेच्या उघडया मैदानात पोहचतील याची दक्षता घ्यावी व सदर वर्ग शिक्षकाने आपल्या मजल्यावरील आपत्कालीन अधिक्षकाला त्याची माहिती दयावी.

५. प्रत्येक वर्गशिक्षकांने आपल्या वर्गातील स्काऊट, एन.सी.सी., एन.एस.एस. इत्यादी उपक्रमांतील सहभागी असलेल्या विद्यार्थांची मदत घ्यावी. सदर विद्यार्थ्यांना शाळेने अग्निशमन स्वयंसेवक (फायर व्हालेंटीयर्स) म्हणून नेमणूक करावी व अशा अधिक्षक व विद्यार्थ्यांची यादी ठळक पणे दिसेल अशा ठिकाणी फलकावर लावण्यात यावी. या विद्यार्थ्यांनी आपआपल्या वर्गातील विद्यार्थ्यांना सुरक्षित स्थळी किंवा शाळेच्या/महाविद्यालयाच्या उघडया मैदानात पोहचविण्यासाठी वर्ग शिक्षकांना सहाय्य करावे.

६. शाळेच्या/महाविद्यालयाच्या सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांनी शाळेच्या इमारतीसंबधी उदा. शाळेच्या बांधकामाची सद्यस्थिती, शाळेतील जिने, उपहार गृह, स्वयंपाक घर, कोठार, प्रयोग शाळा इत्यादींची माहिती करुन घ्यावी. तसेच आपत्कालीन प्रसंगी नजिकच्या मार्गाचा वापर करावा.

७. इमारतीमध्ये लावण्यात आलेल्या अग्निसुचक यंत्रणा, अग्निशमन उपकरणे व इतर सुविधांची माहिती करुन घ्यावी. कुठल्याही आणीबाणीच्यावेळी १०१ हा दुरध्वनी क्रमांक फिरवा

८. इमारत खाली करावयाच्या कवायती अग्निशमन सेवेच्या मदतीने तयार करुन त्याबाबत सर्व कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रशिक्षण देण्यात यावे व त्याचा सराव करण्यात यावा.

९. अग्निशमन विभागाकडून वेळोवेळी मिळणा-या सूचनांचे पालन करावे.

१०. आपत्कालीन प्रसंगी थोडाही वेळ न दवडता त्वरीत नजिकच्या अग्निशमन विभागास दूरध्वनी करुन मदतीसाठी पाचारण करावे.

## आपत्कालीन प्रसंगी काय करावे ?

१) पळू नका-जलद चाला, घाबरु नका-शांत रहा, वर्ग शिक्षकांच्या किंवा मजल्यावरील आपत्कालीन अधिक्षकाच्या सल्ल्याप्रमाणे कृती करा.

२) अग्निशमन विभागाला खबर द्याल.

३) आग लागलेल्या परिसरातील विद्यार्थ्यांना सावध करण्यासाठी आपत्कालीन भोंगा वाजवून सावध करा.

४) उद्‌वाहनाचा (लिफ्ट) वापर करु नका- जिन्याचा वापर करा.

५) स्वच्छतालयात, बाथरुम, प्रसाधन गृहामध्ये आश्रय घेऊ नका.

६) गैरवाजवी धोका पत्करु नका.

७) आपले सामान गोळा करण्यात वेळ घालवू नका.

८) लिफ्ट, वर्गाचे दरवाजे उघडे ठेवू नका.

९) उंचावर किंवा गच्चीवर जाऊ नका.

१०) नजिकच्या जिन्यावरुन तळमजल्यावर खाली येऊन इमारतीच्या आवारात मोकळया जागेत किंवा मैदानात जमा व्हा.

---------

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याबाबतच्या सुरक्षिततेबाबतची करावयाची उपाययोजना.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक: शापोआ २००४/(१५५/०४)/प्राशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ जुलै, २००४

पहाये :- १) शासन निर्णय ,शालेय शिक्षण विभाग क्रमांक :शापोआ १००२/(१२७५/०२)/प्राशि-४, दिनांक १६ मे, २००२.
२) शिक्षण संचालक(प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे अ.शा.प. क्र.प्राशिसं २००४-०५/ड-५१६/४६९८, दि. २० जुलै, २००४.

**शासन परिपत्रक :-** शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना तांदूळाचे वाटप करण्यात येत होते. पी.यू.सी.एल. विरुध्द केंद्र शासन याचिका क्रमांक १९६/२००१ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजवून देण्याचे आदेश दिलेले आहेत. या आदेशानुसार उपरोक्त दिनांक १६ मे, २००२ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या पध्दतीनुसार राज्यात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजवून देण्यात येत आहे.

२. तामिळनाडू राज्यातील कुंभकोणम् येथे घडलेली दुर्दैवी घटना लक्षात घेता सदर योजनेसंदर्भात सुरक्षिततेचा उपाय / प्रतिबंधात्मक खबरदारी म्हणून खालील उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात येत आहे:-

१) सर्व साधारणपणे ज्याठिकाणी शाळा बहुमजली इमारतीत आहे तेथे अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.आगीपासून शाळेला सुरक्षित करण्याच्यादृष्टिने बहुमजली इमारतीत आवश्यकतेनुसार अग्निरोधक यंत्रणा ठेवण्यांत यावी. अग्निशामक यंत्रे घेण्यास ४ टक्के सादिल तसेच वेतनेतर अनुदानातून परवानगी देण्यात येईल.दरवर्षी किंवा नियमितपणे शाळेत अग्निशमन सिलिंडरचे नूतनीकरण करण्यात यावे. सर्वच शाळांमध्ये वाळूच्या बादल्या भरुन आपत्कालीन परिस्थितीत वापरण्यास तयार ठेवाव्यांत.

२) शाळेतील वर्गखोल्यांचा स्वयंपाकासाठी वापर करण्यात येऊ नये.स्वयंपाकाची जागा ग्रामीण भागात शाळेच्या इमारतीपासून किमान १०० फूट दूर असावी.

३) शाळेच्या इमारतीत ज्वालाग्राही पदार्थ ठेवण्यांत येऊ नये. तसेच स्वयंपाकासाठी लागणाऱ्या इंधनाचा उदा.लाकडे, रॉकेल, गॅस सिलिंडर यांचा साठा शाळेत ठेऊ नये.

४) शिक्षकांना सुरक्षिततेचे प्रशिक्षण सिव्हिल डिफेन्स,होम गार्ड यांच्यामार्फत आयोजित करण्यात यावेत.

५) बालवीर, वीरबाला यांचे प्रशिक्षण सहशालेय उपक्रमामध्ये आगीच्यावेळी करावयाच्या उपाययोजनेसंबंधित इतर सहशालेय उपक्रमामध्ये अशा प्रशिक्षणाचा व माहितीचा उपयोग करावा.

६) इमारतीस आग लागणे,भूकंप होणे, छत वा भिंत कोसळणे इत्यादि परिस्थितीत विद्यार्थ्यांनी काय करावे इत्यादिसाठीच्या सूचना शाळेतील भिंती फलकावर लावाव्यांत व विद्यार्थ्यांना समजावून सांगाव्यात. यात प्रथमोपचाराचाही समावेश असावा.

७) जिल्हा परिषदेच्या शाळा इमारत दुरुस्तीसाठी २० टक्के सादिलवार तरतूदीतून पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जिल्ह्यांतील शाळा दुरुस्तीच्या गरजा लक्षात घेऊन दुरुस्तीचे काम प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे.

८) आयुक्त, महानगरपालिका यांनी याबाबत स्वतंत्रपणे आदेश काढून संबंधितांना आवश्यक त्या सूचना द्याव्यांत.

शिक्षण संचालक (प्राथमिक ),महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी यासंदर्भात सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना त्वरित द्याव्यांत व सर्व संबंधितांकडून वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( बि.वा.सुतार )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
शिक्षण संचालक (प्राथमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे .
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
संचालक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, शिवाजीनगर,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक ), जिल्हा परिषदा.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई( उत्तर/ दक्षिण / पश्चिम ),
आयुक्त/ शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
आयुक्त / शिक्षण उपसंचालक, नवी मुंबई महानगरपालिका,नवी मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
निवड नस्ती,प्राशि-४ .

42-C:\pandit\G.R155-04-prashi-4

PP